परिपत्रक

क्र. सीएलआर १९९२/१७०७७/सात                                        मुंबई, ११ जून १९९२

या कार्यालयाचे परिपत्रक क्र. सीएलआर ११९२/१७०७७/सात दिनांक २१ मे १९९२ अन्वये प्रसारीत केलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने काही सीएल-२ अनुज्ञप्तीधारकांनी आयुक्तांच्या असे निदर्शनास आणून दिले कीं, नविन सीएल-२ अनुज्ञप्तीसाठी शहरात अथवा महानगर पालिकेच्या हद्दीत योग्य जागा सहजासहजी मिळणे फार दुरापास्त होते. तसेच नगरपालिका अथवा महानगर पालिका क्षेत्रामध्ये सीएल-२ अनुज्ञप्ती मंजूर केल्यास आवेदकास जकात कर भरल्यानंतरच देशी दारुचा माल बाहेर पाठविता येतो, त्यामुळे साहजिकच देशी दारुची विक्री कमी होण्याची शक्यता आहे. म्हणून वरील सर्व बाबींचा विचार करुन वरील परिपत्रकांमध्ये काढलेल्या धोरणात्मक निर्णयामध्ये अंशत: फेरबदल करुन, असे ठरविण्यांत आले आहे कीं, जर आवेदकास नगर पालिकेच्या किंवा महानगर पालिकेच्या हद्दीच्या जवळपास ग्रामपंचायत मध्ये जागा मिळत असेल व त्याचा आवेदकाकडून गैरवापर होण्याचा संभव नसेल तर आवेदकांच्या अशा अर्जाचा विचार करण्यात हरकत नाही.

२. या परिपत्रकाची पोच द्यावी.

[ बलदेव चंद ]
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१] सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,

२] सर्व जिल्हाधिकारी, सस्नेह,

३] सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,

४] सर्व कार्यासन अधिकारी,

५] अभिलेख शाखा [ ५ प्रती]

१०६११९९२